# “सेवानिवृत्ती हा सेवेला पूर्णविराम नसतो; आपल्या कार्यातून निर्माण केलेल्या आदर्शांचा तो पुढच्या पिढीकडे सोपवलेला वारसा असतो.”

दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | गुरुवार , 27 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 110 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# कर्तव्यनिष्ठ अरविंद येरणे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव



**“सेवेला निरोप असला, तरी संस्कारांची शिदोरी आणि कार्यशैलीची प्रेरणा कायम स्मरणात राहील.”**

**“कर्तव्याला प्राधान्य, नियमांना मान आणि संस्थेच्या हिताला सर्वोच्च स्थान हीच अरविंद येरणे यांच्या 34 वर्षांच्या सेवायात्रेची खरी ओळख.”**

**“अरविंद येरणे हे अत्यंत शांत, संयमी आणि कर्तव्यदक्ष अधिकारी. कोणतेही काम प्रलंबित न ठेवता कार्यतत्परतेने त्याचा निपटारा करण्याची त्यांची कार्यशैली नेहमीच प्रेरणादायी राहिली.”**

महानिर्मितीच्या परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या वित्त व लेखा विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद महादेव येरणे हे तब्बल ३४ वर्षांहून अधिक काळाची प्रदीर्घ, निष्कलंक आणि मूल्यनिष्ठ सेवा बजावून ३१ ऑगस्ट २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवापूर्तीच्या निमित्ताने २८ ऑगस्ट रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात सेवागौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



### ३४ वर्षांची प्रामाणिक सेवायात्रा

अरविंद महादेव येरणे यांचा जन्म १६ ऑगस्ट १९६८ रोजी चंद्रपूर येथे झाला. त्यांनी २५ नोव्हेंबर १९९१ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, चंद्रपूर येथे कनिष्ठ लिपिक (LDC) म्हणून आपल्या सेवाकार्यास प्रारंभ केला. चंद्रपूर येथे तब्बल ३१ वर्षे सेवा बजावल्यानंतर ९ मे २०२२ रोजी पदोन्नतीने वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रात रुजू झाले.पॉवर स्टेशन कॉन्ट्रॅक्टर अँड सप्लाय असोसिएशन, परळी वैजनाथ च्या वतीने दिनांक १० में २०२२ रोजी  या प्रसंगी अध्यक्ष अंगदभाऊ हडबे,भगवान साकसमुद्रे यांच्या सह आदींनी स्वागत केले. परळीतील चार वर्षांहून अधिक काळाच्या कार्यकाळात त्यांनी वित्त व लेखा विभागातील बिलिंग, निविदा प्रक्रिया, कंत्राटदारांची देयके आणि आर्थिक व्यवहार यामध्ये पारदर्शकता, अचूकता आणि समन्वयाला सर्वोच्च प्राधान्य दिले.

### राख विक्रीतून महसूलवाढीत महत्त्वपूर्ण योगदान

महानिर्मितीच्या परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रात मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली राख उपयोगिता विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने उल्लेखनीय कामगिरी केली. ड्राय फ्लाय अॅश आणि पॉण्ड अॅशच्या पारदर्शक निविदा प्रक्रियेतून जवळपास १० कोटी रुपयांचा महसूल महानिर्मितीच्या तिजोरीत जमा करण्यात आला. या संपूर्ण आर्थिक व्यवहारात वित्त व लेखा विभागाने काटेकोर आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता जपत अचूक लेखाजोखा ठेवला. महाराष्ट्र शासनाच्या सुधारित धोरणानुसार राखेची वैज्ञानिक, पर्यावरणपूरक आणि व्यावसायिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी राबविण्यात आलेल्या नियोजनबद्ध निविदा प्रक्रियेत वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. राखेचा योग्य वापर, पर्यावरणीय जबाबदारी आणि महानिर्मितीच्या महसुलात वाढ—या तिन्ही बाबींचा समतोल साधताना येरणे यांची वित्तीय शिस्त, पारदर्शक कार्यपद्धती आणि व्यवस्थापन कौशल्य ठळकपणे अधोरेखित झाले. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे राख विक्री प्रक्रियेला अधिक शिस्तबद्ध आणि पारदर्शक स्वरूप प्राप्त झाले.

### विचारांची कास, मूल्यांची साथ

नोकरी ही केवळ कर्तव्यपूर्ती नसून मूल्यांची जपणूक करण्याचे माध्यम आहे, या विचाराने येरणे यांनी आपली सेवावाटचाल केली. महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत जगनाडे महाराज यांच्या विचारांची प्रेरणा त्यांनी आपल्या कार्यातून जपली. प्रामाणिकता, सचोटी, पारदर्शकता आणि प्रागतिक विचार यांचा आग्रह धरत त्यांनी सामाजिक जागृतीसाठीही योगदान दिले. तेली समाजातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आणि मार्गदर्शक भूमिका राहिली आहे.



### अधिकारी आणि सहकाऱ्यांसोबत समन्वयपूर्ण कार्यप्रवास

परळी औष्णिक वीज केंद्रातील आपल्या सेवाकाळात अरविंद येरणे यांनी वरिष्ठ अधिकारी, सहकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत नेहमीच समन्वय, सहकार्य आणि सौहार्दपूर्ण वातावरणात कामकाज केले.  परळी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, उपमुख्य अभियंता महेश महाजन, प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता संभाजी बुकतारे, कल्याण अधिकारी शरद राठोड यांच्यासह त्यांनी विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत समन्वयाने काम केले. वित्त व लेखा विभागातील व्यवस्थापक एस. बी. डोंगरे, जी. डी. जोशी, प्रभारी व्यवस्थापक अविनाश मुळे तसेच व्ही. जे. राठोड, पी. व्ही. ऐवळे, श्रीनिवास गित्ते, मनोज जाधव, हनुमान सुरवसे, बालाजी पवार, प्रदीप उडघे, संतोष कुंडकर, समाधान जाधव, चैतन्य मानकर, बिभीषण, भोसले मामा आदी सहकाऱ्यांसोबत त्यांनी जबाबदारीने आणि परस्पर विश्वासाच्या वातावरणात काम केले.

### निष्कलंक सेवेला मनःपूर्वक सलाम!

चंद्रपूरपासून परळीपर्यंतच्या ३४ वर्षांपेक्षा अधिक सेवाकाळात मूल्यांशी कोणतीही तडजोड न करता जपलेले निष्कलंक चारित्र्य, कर्तव्यनिष्ठा आणि पारदर्शक कार्यशैली हीच अरविंद येरणे यांच्या सेवाकार्याची खरी ओळख आहे. पदावर असताना अधिकारापेक्षा जबाबदारीला, व्यवहारापेक्षा मूल्यांना आणि व्यक्तिगत यशापेक्षा संस्थेच्या हिताला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या सेवानिवृत्तीने सेवापर्वाला विराम मिळत असला, तरी त्यांनी निर्माण केलेली मूल्यनिष्ठ कार्यसंस्कृती आणि आदर्श कार्यशैली भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. अरविंद येरणे यांच्या प्रदीर्घ, निष्कलंक आणि कर्तव्यदक्ष सेवेला मनःपूर्वक सलाम! त्यांच्या भावी जीवनासाठी उत्तम आरोग्य, आनंद, समाधान आणि यश लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

### कुटुंबाची मोलाची साथ

अरविंद येरणे यांच्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवायात्रेमागे त्यांच्या कुटुंबाची भक्कम साथ आणि मोलाचे सहकार्य राहिले आहे. जीवनसाथी सौ. मनीषा अरविंद येरणे यांनी प्रत्येक टप्प्यावर दिलेली साथ, आणि प्रोत्साहन हे त्यांच्या यशस्वी सेवापर्वाचे महत्त्वाचे बळ ठरले. कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळेच सेवाकर्तव्य आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांचा सुंदर समतोल साधत त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने प्रामाणिकपणे योगदान दिले. त्यांच्या या सेवायात्रेचा अभिमानाचा भाग म्हणजे त्यांची दोन्ही मुले—आदित्य सीए फाउंडेशनचे शिक्षण घेत असून सारंग बी.ई.च्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. “यशस्वी सेवापर्वाच्या प्रत्येक पावलामागे कुटुंबाची निःशब्द साथ असते येरणे यांच्या ३४ वर्षांच्या प्रवासात हीच साथ त्यांच्या सामर्थ्याची खरी ओळख ठरली.”



“अरविंद येरणे हे अत्यंत शांत, संयमी आणि कर्तव्यदक्ष अधिकारी. कोणतेही काम प्रलंबित न ठेवता कार्यतत्परतेने त्याचा निपटारा करण्याची त्यांची कार्यशैली नेहमीच प्रेरणादायी राहिली.”
**— एस. बी. डोंगरे,**
व्यवस्थापक, (वित्त व लेखा विभाग),
औष्णिक विद्युत केंद्र, परळी वै.

“वित्त व लेखा विभागात नियम आणि शिस्तीला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी कामकाजाला एक वेगळी दिशा दिली. त्यांची प्रभावी कार्यशैली, निर्णयक्षमता आणि शिस्तप्रियता निश्चितच अनुकरणीय आहे.”
**— शरद राठोड,** (सहाय्यक कल्याण अधिकारी),
औष्णिक वीज केंद्र, परळी वै.

शब्दांकन : भगवान साकसमुद्रे

# संपादकीय

## कोकणचं कॅलिफोर्निया अन् बारामती...!

कोकणच्या कॅलिफोर्नियाच्या 'गजाली' ऐकूणच कोकणातील आजची साठी-सत्तरीतली पिढी लहानाची मोठी झाली. त्यावेळच्या जाहीर सभा, समारंभामध्ये विशेषकरून निवडणूक काळात तर, कोकणचं कॅलिफोर्निया केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशा प्रकारची भाषणं ऐकायला मिळायची. त्याकाळच्या विद्यार्थी दशेतील सर्वांनाच 'कॅलिफोर्निया' म्हणजे काय आहे? कोकणचं कॅलिफोर्निया होणार म्हणजे काय होणार? हा प्रश्न सतत मनात यायचा. कोकणचं निसर्ग सौंदर्य कॅलिफोर्नियापेक्षाही सुंदर आहे. इथली नैसर्गिकता ही सर्वात अग्रस्थानी आहे. हे नंतरच्या काळात चर्चेतून ऐकायला मिळाले. १९९० पर्यंतच्या जवळपास कोकणातील होणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत कॅलिफोर्निया आणि कोकण याची भाषणातून तुलना व्हायची. त्यासंबंधी किमान कोकण हे कॅलिफोर्नियापेक्षाही अधिक उजवं आहे. हे नंतरच्या काळात कोकणाला कळून चुकले.

कोणत्याही भागाचा विकास हा सकारात्मक मानसिकतेवर अवलंबून रहातो. महाराष्ट्राची राजधानी मुंबईला लागून असलेला ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे मिळून कोकण होतं. या कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गाची भौगोलिकता एकसमान आहे. रायगड ते सिंधुदुर्गला निसर्ग, समुद्र हे सारेच सोबत आहेत. एवढं सृष्टीसौंदर्य आपणाकडे असतानाही ज्या पद्धतीने प्रगतीची गती अधिकतर असायला हवी होती, तशी ती आपणाला राखता आली नाही. कोकणचा कॅलिफोर्निया होणार या गावगप्पांमध्येच अनेक वर्षे आपण वाया घालवली. १९९० नंतर खऱ्या अर्थाने कोकणच्या विकासासंबंधी काही चर्चा होऊ लागली. तत्पूर्वीपर्यंत, कोकणाला काय हवे - मासे, भात आहे. दोन वेळची भ्रांत कोकणवासियांना नाही. या अशा विचारातच आपण गढून गेलो होतो. शेती, बागायती पलीकडे विकासाच्या वाटा आहेत. या वाटेवरून चालण्याचा प्रयत्न पूर्वी कोणी केला नाही. शिक्षणाच्या सोईच उपलब्ध नसल्याने तरूणांना शिक्षणाच्या नवीन वाटा खुणावण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे दहावी, बारावी पास झाल्यावर मुंबईला जाऊन मिळेल ते काम करणे या अशा चौकटीतल्या वातावरणात कोकणचा तरूण खरंतर नवीन काही करण्याच्या मानसिकतेतच राहिला नाही. कॅलिफोर्नियाच्या स्वप्नरंजनातून कधीचाच कोकण बाहेर आला. परंतु विकासाच्या नव्या वाटेवर चालण्याची त्याची मानसिकता मात्र खुज्या मनाच्या राजकीय पुढाऱ्यांनी वाढूच दिली नाही. त्यामुळे कोकणातील काहींच्या मते कोकणात नवीन काही उद्योग नको, विकासाचे कोणतेही प्रकल्प नको. आम्हाला काही नको. पण आम्हाला विकास हवा. काही नको असं एकीकडे म्हणायचं, तसा आग्रह धरत काहींचा बुद्धीभेद करायचा आणि दुसरीकडे रोजगाराच्या कोणत्याही संधी कोकणात नाहीत म्हणून गळा काढायचा, अशा दुटप्पी आणि कोणतंही 'व्हीजन' नसलेल्या विचारधारेने कोकणाचं फार मोठं नुकसानच झालं आहे.

एकीकडे या अशा मानसिकतेचीच लोकं पुन्हा बारामतीचा किती विकास झाला. मग कोकणात एवढे मोठे नेते असून काय केलं? म्हणून प्रश्न उपस्थित करणार. बारामतीचा विकास निश्चितच नजरेत भरणारा झाला आहे. परंतु त्यामागच्या कारणांची चर्चा करण्याचीही आपली तयारी असायला हवी. ज्येष्ठ नेते खा. शरद पवार अनेक वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले. केंद्रिय मंत्री राहिले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार दीर्घकाळ महाराष्ट्राच्या सत्तेचे वाटेकरी राहिले. अर्थमंत्रालय अनेकवर्षे त्यांनी सांभाळले. साहजिकच सत्तेतील विकासनिधीच्या माध्यमातून सारा वाटा बारामतीकडे वळवला गेला. अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थांची निर्मिती झाली. जे प्रकल्प उभे राहिले त्यामागे निश्चितपणे नेते शरद पवार आणि पवार कुटुंबियांचे मोठं योगदान राहिले आहे. परंतु त्याचबरोबर बारामतीच्या गतिमान विकास प्रक्रियेला बारामतीच्या जनतेने विरोधाची भूमिका न घेता सतत त्याची पाठराखण करत राहिले. विरोधासाठी विरोध करणारी आणि जनतेचा बुद्धीभेद करणारी टाळकी बारामतीत नाहीत. उलट विकासाला मूक सहमती देणारे राजकीय पुढारी एकीकडे बारामतीत असाताना निवडणुका जाहीर झाल्यावर पक्षीय, वैचारिक विरोध म्हणून शरद पवार, अजित पवार यांच्याविरोधात निवडणुकीला कडाडून विरोध करणारेही गेली अनेकवर्षे बारामतीत आहेत. राजकीय विरोध करणं वेगळं आणि विकासाच्या आडवं जात सातत्याने विकासप्रक्रियेला विरोध करणं वेगळी गोष्ट आहे.

या गफलती बारामतीत कधी कोणी केल्या नाहीत. त्यामुळेच बारामतीचा विकास होऊ शकला ही वस्तुस्थिती आहे. याउलट आपल्या कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात कोणताही नवीन विकासाचा प्रकल्प आला, त्याची साधी चर्चा जरी झाली तरीही त्याला विरोध हा ठरलेलाच असतो. काही संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते केवळ विरोधी वातावरण तयार करतात. जेणेकरून चांगल काहीही उभं राहू नये, विकासाचा प्रकल्प कोकणात येऊच नये यासाठी प्रयत्न करणारे काही तथाकथित सामाजिक, राजकीय कार्यकर्ते कार्यरत आहेच. गंमत म्हणजे हेच विरोध करणारे बारामतीत शरद पवार, दिवंगत अजित पवार यांनी कसा विकास केला यावर गजाली करताना दिसतात. १९९० साली कोकणच्या राजकारणात खा. नारायण राणे यांची एंण्ट्री झाल्यानंतर अनेक प्रकल्प आणण्याचे प्रयत्न केले. परंतु प्रत्येक नवीन येणाऱ्या प्रकल्पांना विरोध करण्याचाच प्रयत्न काहींनी केला. कोकणातील कोणताही विकास प्रकल्प ठराविक कालमर्यादेत उभा राहू शकला नाही. सिंधुदुर्गातील चिपी विमानतळ आज ज्या स्वरूपात आहे, खरंतर चिपी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचा मूळ आराखडा होता. परंतु चिपी विमानतळ प्रकल्पाला काळे झेंडे दाखवत विरोध झाला, तेव्हा मोपाला आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रस्तावही नव्हता. तेव्हा चिपीला विमानतळाचा प्रस्ताव पुढे आलेला. परंतु राजकारणासाठी विकासाला विरोध करण्याच्या मानसिकतेने चिपीला आंतरराष्ट्रीय विमानतळही नाही. आंतरदेशीय विमानतळ उभारणीलाही विलंबच झाला. याच वास्तविकतेचा कधीतरी विचार करण्यात आला पाहिजे. बारामतीतील झालेला विकास याच सारं श्रेय जसे शरद पवार, अजित पवार यांना आहे तसंच ते तिथल्या जनतेने पवार यांना जी साथ, पाठींबा आणि सहकार्य केलं त्यालाही जातं हे निश्चितपणे कुणालाही नाकारता येणारे नाही. त्यामुळे कोकणची नेहमी बारामतीशी तुलना केली जात असताना कोकणच्या राजकीय नेते, पुढाऱ्यांनी, जनतेने सकारात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे.



# आद्य वस्त्र निर्माता शिवपुत्र भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात संपन्न

### हभप भरत महाराज सोडगीर यांनी विशद केली भगवान जिव्हेश्वरांची महती

■ परळी / प्रतिनिधीः

तीर्थक्षेत्र परळी वैजनाथ येथे समस्त स्वकुळ साळी समाज बांधवांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी अध्य वस्त्र निर्माता शिवपुत्र भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून उत्साहात संपन्न झाला. यावेळी शोभायात्रा आणि कावड यात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. शहरातील जगमित्र मंदिर येथून नेहरू चौक, देशमुखपार, वैद्यनाथ गल्ली, वैद्यनाथ मंदिर ते जगमित्र मंदिर या मार्गे भगवान जिव्हेश्वर यांच्या प्रतिमेची शोभायात्रा व भगवान शंकराची कावड यात्रा काढण्यात आली. यात समस्त साळी समाज बांधव सहभागी झाले होते. यात मृदंग, टाळकरी महिला , ग्रंथ दिंडीत आणि कलशधारी महिला पताकाधारी मुले - मुली अशा या संवाद्य शोभायात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

दुपारी आयोजित काल्याच्या कीर्तनात हरिभक्त परायण भरत महाराज सोडगीर यांनी भगवान श्री जिव्हेश्वर बद्दल अभ्यासपूर्ण विवेचन करून उपस्थित समाज बांधवांना मंत्रमुग्ध केले.

शहरातील संत जगमित्र नागा मंदिर येथे गुरुवारी सकाळी ५.४६ जन्मोत्सव त्यानंतर पाळणा व आरती करण्यात आली. जगमित्र मंदिर सभागृहात भरत महाराज सोडगीर यांचे काल्याचे किर्तन आयोजित केले होते यामध्ये भरत महाराजांनी अध्यय वस्त्र निर्माता भगवान श्री जिव्हेश्वरन बद्दल अभ्यासपूर्ण विवेचन करून उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन करत आपल्या अमोघ वाणीने मंत्रमुग्ध केले. दुपारी महाप्रसादासाठी भाविक आणि समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान शहराच्या नगराध्यक्ष सौ.पद्मश्री धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती जयश्री गीते यांनी भेट देऊन समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

भगवान जिव्हेश्वरांच्या शोभा यात्रेत ग्रंथदिंडी आणि कावड यात्रेत महिला पुरुष यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला त्यावेळी भगवान जिव्हेश्वर यांचा नाम घोष शिव नामाचा जयघोष, ,हर हर महादेव, जय शिवशंभो, आदि घोषणांनी परिसरात चैतन्य निर्माण केले.

लहान मुलांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा चित्रकला स्पर्धा महिलांसाठी वन मिनिट आणि संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यांना बक्षीस वितरित करून त्यांचे कौतुक करण्यात आलं.यावेळी मुख्य अन्नदाते मुंजाभाऊ धोंडिबा पोटे यांच्या सहकार्याबद्दल समाजाचे वतीने त्यांच्या यथोचित गौरव करण्यात आला. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास सायं. आरती होऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

सोहळ्यानिमित्त सात दिवसाचे साप्ताहिक जिव्हेश्वर विजय ग्रंथाचे पारायण आयोजित करण्यात आले होते. यामध्ये स्वाती ताटे, वैजयंती इंगळे, जंत्रे, मंजुषा पोरे, कल्पना ठोंबरे, मंजुषा आरबुने, मीरा घट्टे, सीताबाई भंडारे, आरती आरबुने, सारिका आरबुने, पद्मा लटगे, अश्विनी बोनगे, किरण गालम, सविता लिखे, जनाबाई लटगे, व इतर महिलांची उपस्थिती होती.

दिवसभरातील सर्व धार्मिक कार्यक्रमाचे पुरोहित्य संत जगमित्र मंदिराचे पुरोहित्य उदय औटी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व महिला पुरुष युवती आणि युवकांनी आदींनी परिश्रम घेतले. सायंकाळी भगवान जिव्हेश्वर यांच्या आरतीने जन्मोत्सव सांगता झाली.

# शैक्षणिक आणि संघटित बळावर आपली स्वतःची ताकद निर्माण केली पाहिजे,"

### आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेशजी घोडे यांचे प्रतिपादन

■ सिरसाळा : प्रतिनिधी



"सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात वंचित घटकांना आजही स्वतःच्या हक्कांसाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे देशाच्या विकासात महत्त्वाचा वाटा असूनही निर्णय प्रक्रियेत वंचित समाज आजही उपेक्षित राहिला आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी तरुणांनी केवळ आश्वासनांवर अवलंबून न राहता, शैक्षणिक आणि संघटित बळावर आपली स्वतःची ताकद निर्माण केली पाहिजे," असे धडाकेबाज प्रतिपादन आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेशजी घोडे यांनी परळी तालुक्यातील पिंपरी बुद्रुक येथे केले.येथे आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती महोत्सवाचे मुख्य उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या भव्य सोहळ्याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते उत्साहात ध्वजारोहण करून आणि अण्णाभाऊ साठे यांच्यासह इतर महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या वेळी कार्यक्रमास व्यासपीठावर परळी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण पौळ, सरपंच माणिकराव पौळ, बबन पौळ,रमेश पौळ,सुरेश माने,विक्रम मिसाळ, माजी पंचायत समिती सदस्य वसंतराव राठोड,अनिल माने, बबन कसबे, रुस्तुम माने, दत्तात्रय काळे,मिलिंद चोपडे, तसेच शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष यांच्या सह गावातील व समाजातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राजेश घोडे यांनी सध्याची समाजव्यवस्था, समाजाची सद्यस्थिती आणि वंचित घटकांच्या राजकीय-सामाजिक संघर्षावर सखोल भाष्य केले. राजकीय पक्षांनी वंचित समाजाचा केवळ मतपेढी म्हणून वापर केला असून, सत्तेत आणि महत्त्वाच्या पदांवर त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी आजही संघर्ष करावा लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ही विषम समाजव्यवस्था मोडून काढण्यासाठी समाजाने आपल्या मुलांना उच्चशिक्षित करून प्रत्येक क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. अण्णाभाऊंनी आयुष्यभर शोषितांच्या न्यायासाठी आणि हक्कासाठी आपल्या लेखणीतून लढा दिला, तोच क्रांतीचा वारसा आता तरुणांनी पुढे नेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या प्रबोधनात्मक जयंती सोहळ्यासाठी पिंपरी बुद्रुक आणि परिसरातील अबालवृद्धांसह महिला, तरुण आणि समाज बांधवांची अथांग उपस्थिती लक्षणीय होती. या अभूतपूर्व जयंती सोहळ्यात पिंप्री बु. गावातील नीट परिक्षा व इतर परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक लक्ष्मण वैराळ सर ,सुत्रसंचलन गोपाळराव वैराळ,संतराम वैराळ तर आभार प्रदर्शन भीमराव वैराळ यांनी केले. अत्यंत उत्साही, प्रेरणादायी आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेला हा सोहळा यशस्वी करण्यासाठी स्थानिक संयोजन समिती, तरुण कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शिकाल तर टिकाल,समाज बांधवांनो गुलामीचे प्रतिके सोडून द्या यावेळी प्रसिद्ध विचारवंत लक्ष्मण वैराळसर यांनीही समाजाला परिवर्तनाचा स्पष्ट संदेश दिला. "शिक्षणाशिवाय समाजाचा उद्धार शक्य नाही. मातंग समाजाने आता हलगी वाजवणे किंवा जुन्या पारंपरिक रुढी-परंपरा या गुलामीच्या प्रतिकांना कायमचे सोडून दिले पाहिजे. हातामध्ये हलगी ऐवजी लेखणी घेऊन मुख्य प्रवाहात सामील व्हावे," समाजात शैक्षणिक क्रांतीची गरज आहे असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी महात्मा फुले यांच्या चळवळीत लहुजी साळवे यांचे योगदान, मुक्ता साळवे ,अण्णाभाऊ यांचा इतिहास सांगतानाच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग हाच बहुजनांच्या प्रगतीचा मार्ग आहे त्या मार्गानेच वर्तमानात आणि भविष्यात मार्गक्रमण करावे लागेल असेही लक्ष्मण वैराळ सर यांनी म्हटले आहे.

# मातोश्री विद्यालयामध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध उपक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

■ महागाव प्रतिनिधी



महागाव येथील स्थानिक मातोश्री विद्यालयामध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष रावसाहेब नरवाडे, प्रमुख अतिथी लक्ष्मण कानडे, शरदचंद्र मामीडवार व विद्यालयाच्या प्राचार्य अनुताई गावंडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत बारावी बोर्ड परीक्षेत विद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याचे पालक अविनाश राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीताने झाली. यावेळी निधी कोल्हेकर, रियांशी जाधव, शिवन्या शिंदे, साक्षी शेंडगे, आरुषी भवानकर, विहान पाईकराव, स्वाती जाधव, माही गावंडे, रिद्धी राऊत, आरसलान यलालकर, अनुजा इनकर, सार्थक राठोड, प्रियांशी गायकवाड, संचिता भालेराव, शिवन्या नरवाडे, प्रदीप आव्हाड, श्रीयांश चिकटे, सोमेश जाधव, हर्ष गडवे, श्रीतेज रोकडे, वृत्तिका वाघमारे, सोहम नरवाडे, समर्थ गावंडे, अर्णव जाधव, मानवीक सरदार, प्रानवी शिंदे, आराध्या राऊत इत्यादी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषण, नृत्य व वेशभूषा यांचे सादरीकरण केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तिरंगा रॅली, कला प्रदर्शन असे उपक्रम घेण्यात आले

यावेळी विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत सर्वोत्कृष्ट गुण घेणारे व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांच्या खाऊ वाटपाने झाली.

# "प्रपंच्यात वय वाढले तर किंमत कमी होते, पण परमार्थात वय वाढले तर किंमत वाढते" : ह.भ.प. परस महाराज मुथा

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

मौजे वाहिरा, माणिक गड ट्रस्ट येथे सुरू असलेल्या ४६ व्या अखंड हरिनाम सप्ताहातील पाचव्या दिवसाची कीर्तन सेवा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडली. पाचव्या दिवसाचे कीर्तनकार ह.भ.प. परस महाराज मुथा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीने भाविकांना मंत्रमुग्ध केले. कीर्तनातून त्यांनी सांगितले की, "प्रपंचात वय वाढले तर किंमत कमी होते, पण परमार्थात वय वाढले तर किंमत वाढते."त्यांनी गायनातून व थोर महापुरुषांच्या विचारांवर प्रभावी निरूपण करत श्रोत्यांना परमार्थाची गोडी लावली. या दिवशीचे संतपूजन आटोळे ग्रुप यांच्यावतीने करण्यात आले. कीर्तन झाल्यानंतर स्वादिष्ट अशा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनासाठी वाहिरा व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# वन विभागाचा कार्यवाहीचा बडगा अवैध वृक्ष तोडणाऱ्यांची धाबे दणाणले

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील सेंनद बिट गस्ती दरम्यान टेंबुरदरा गांवात परराम बबन तारफें याचे राहते घरी तपासनी केली असता सागवान वृक्षाची अवैध कटाई करून चिराण माल साठवून ठेवल्याचे आढळून आले असता वरील आरोपीस पुढील चौकशी करीता ताब्यात घेऊन वन गुन्हा जारी केला.

तसेच आरोपी कडून सागवान वृक्ष जंगलातील कोणत्या ठिकाणावरून तोडले आहेत याचे चौकशी करीता न्यायालयात सादर करून वन कोठडी ची मागणी करण्यात आली असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी राज ओवे यांनी सांगितले.

वनपरिक्षेत्र विभागाचे नुकतेच पदभार सांभाळलेले वनपरिक्षेत्र अधिकारी राज ओवे यांनी कार्यवाहींचा धडाका चालू केल्याने अवैद्य वृक्ष तोडणाऱ्यांची धाबे दणाणले असल्याचे पहावयास मिळत आहे

# बीड पोलिसांच्या संवेदनशीलतेने निवृत्त श्वानांचा सन्मान

**बीड |** पोलिस दलात गुन्ह्यांचा शोध घेण्यापासून ते व्हीआयपी बंदोबस्तापर्यंत अखंड आणि अत्यंत प्रामाणिक सेवा बजावणाऱ्या पोलीस श्वानांबाबत राज्य शासनाने एक अत्यंत संवेदनशील आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पोलिस दलातून निवृत्त झाल्यानंतर या श्वानांना आता इतर कोणाकडे किंवा केंद्रात न पाठवता, त्यांच्यासोबत सेवा बजावणाऱ्या "हँडलर' कडेच सोपवले जाणार आहे. निवृत्तीनंतरही हे श्वान आयुष्यभर लाडक्या हँडलरसोबत राहू शकतील, या निर्णयावर शासनाने अधिकृत शिक्कामोर्तब केले आहे. विशेष बाब म्हणजे राज्यासाठी लागू झालेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयाचे मुख्य श्रेय बीड पोलिस दलाला जाते. श्वान पथकाने ही मागणी केली होती. नुकताच पोलिस महासंचालक सदानंद दाते यांनी बीड जिल्ह्याचा दौरा केला होता. या दौऱ्यादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या दरबारात पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड श्वान




पथकातील हेड कॉन्स्टेबल संजय खाडे यांनी हा विषय गांभीर्याने मांडला होता. "पोलीस श्वान जेव्हा लहानाचे मोठे होतात आणि सेवा बजावतात, तेव्हा हँडलर आणि श्वानामध्ये एका घट्ट कौटुंबिक व भावनिक नाते निर्माण होते. शासनाच्या या निर्णयामुळे आता राज्यभरातील सर्वच पोलीस ठाण्यांमधील व श्वान पथकांतील मूक साथीदारांना निवृत्तीनंतरही सन्मानाने आणि त्यांच्या लाडक्या हँडलरच्या मायेच्या छत्रछायेखाली आयुष्य जगता येणार आहे. ४०० श्वानांना याचा फायदा होणार आहे. एका पोलीस कर्मचाऱ्याने मांडलेल्या संकल्पनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस श्वानांच्या आयुष्याला एक सन्मानजनक दिशा मिळाली आहे. हेड कॉन्स्टेबल संजय खाडे यांच्या या संवेदनशील आणि रास्त मागणीची तात्काळ गांभीर्याने दखल घेतली. या प्रस्तावाचा विचार करत राज्य शासनाने श्वानांच्या निवृत्ती नंतरच्या पुनर्वसनाबाबतच्या नियमावलीत धोरणात्मक बदल केला.

# भागवत अनारसे यांना मानाचा 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार' प्रदान; बीड जि. प.चे

## सीईओ जितिन रहमान यांच्या हस्ते झाला सपत्नीक सन्मान

आष्टी (प्रतिनिधी) | सराटेवडगाव आनंदवाडी व दौलावडगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी भागवत शिवाजी अनारसे यांच्या उल्लेखनीय व गतिमान प्रशासकीय कार्याची दखल घेत त्यांना ग्रामविकास विभागाचा मानाचा 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार' नुकताच प्रदान करण्यात आला.बीड येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितिन रहमान (भा. प्र.से.) यांच्या हस्ते अनारसे यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला.भागवत अनारसे यांनी कार्यक्षेत्रात राबवलेले महत्त्वाचे उपक्रम,

ग्रामविकास व पारदर्शक प्रशासन, ग्रामपंचायतीच्या कारभारात गतिमानता, सुलभता आणि डिजिटल पारदर्शकता, स्वच्छता व पर्यावरण, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासह गावात प्रभावी स्वच्छता मोहीम, लोकसहभाग व समृद्ध पंचायतराज, 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत विविध शासकीय योजनांची तळागाळापर्यंत यशस्वी अंमलबजावणी. पायाभूत सुविधा, रस्ते,पाणीपुरवठा आणि रोजगार हमी योजनेच्या कामांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केले. या गौरव सोहळ्यास जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती:

उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. काळे सर गटविकास अधिकारी आष्टीचे श्री. प्रयाग ढमाळ,जिल्ह्यातील विविध पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी ग्रामपंचायत अधिकारी संघटनचे सर्व पदाधिकारी व सदस्य,सराटेवडगाव आनंदवाडी व दौलावडगावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थ व रोजगार सेवक भागवत अनारसे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार, 27 ऑगस्ट 2026





# गोपीनाथ गडावर लक्ष्मण हाके नतमस्तक

## ओबीसी आरक्षणावर सरकारला घेरले

### “मी थकणार नाही, मी रुकणार नाही, मी कुणासमोर झुकणार नाही” या विचारातून ऊर्जा घेत ओबीसींच्या हक्कांसाठी लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार

## आज मात्र ओबीसींच्या आरक्षणासाठी त्यांच्यासारखे ठामपणे बोलणारे नेतृत्व दिसत नाही

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेणारे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी गोपीनाथ गड येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर काही वेळ मौन पाळत त्यांनी मुंडे यांच्या कार्याला अभिवादन केले. समाधीस्थळावरील “मी थकणार नाही, मी रुकणार नाही आणि कुणासमोर झुकणार नाही” या विचारातून आपल्याला संघर्षाची प्रेरणा मिळत असल्याचे हाके यांनी सांगितले.

गोपीनाथ मुंडे यांचा खेडेगावातून राज्याच्या राजकारणातील महत्त्वाच्या नेतृत्वापर्यंतचा प्रवास हा संघर्ष आदर्श असल्याचे हाके म्हणाले. ओबीसी समाजाला संघटित करण्यासाठी तसेच भटक्या-विमुक्त समाजाच्या प्रश्नांसाठी मुंडे यांनी केलेले कार्य मोठे असल्याचे त्यांनी नमूद केले.

ओबीसी आरक्षणाचा प्रश्न संसदेत आला की पक्षापेक्षा सामाजिक न्यायाला प्राधान्य देण्याची भूमिका गोपीनाथ मुंडे यांनी घेतली. आज मात्र ओबीसींच्या आरक्षणासाठी त्यांच्यासारखे ठामपणे बोलणारे नेतृत्व दिसत नाही,” अशी खंत हाके यांनी व्यक्त केली.





■ **‘मुंडे साहेब असते तर मार्ग काढला असता’**

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारच्या निर्णयांवर गंभीर आक्षेप घेत हाके यांनी म्हटले की, “गोपीनाथ मुंडे आज असते तर त्यांनी सर्व संबंधित नेत्यांना एका व्यासपीठावर बसवून ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला असता.”

मराठा आरक्षणाच्या मागणीवरूनही हाके यांनी मनोज जरांगे यांच्या भूमिकेवर जोरदार टीका केली. ईडब्ल्यूएस आणि एसईबीसीसारखे पर्याय उपलब्ध असताना सुद्धा जरांगे हे जाणून बुजून ओबीसांच्या हक्काचे आरक्षण त्यांना हवं आहे असेही ते यावेळी म्हणाले. जरांगेंची ही नोटंकी आहे जरांगे हे राजकारण करत आहेत.

असताना ओबीसी आरक्षणाच्या वाट्याला धक्का बसू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाचा ओबीसी विद्यार्थ्यांच्या हक्कांवर परिणाम होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

■ **‘मीडियाचे लक्ष वेधण्यासाठी नाही, विचारांची ऊर्जा घेण्यासाठी आलो’**

गोपीनाथ गडावर येण्यामागे प्रसिद्धीचा हेतू नसल्याचे स्पष्ट करत हाके म्हणाले, “मीडियाचे लक्ष वेधण्यासाठी नव्हे, तर गोपीनाथ मुंडे यांच्या विचारांतून ऊर्जा घेण्यासाठी मी गोपीनाथ गडावर आलो आहे.”

आपल्या आक्रमक वक्तव्यांमुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर त्याबद्दल माफी मागत असल्याचेही हाके यांनी सांगितले. मात्र, ओबीसी आरक्षणावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्यास आपण शांत बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

■ **साडेचारशेहून अधिक ओबीसी जात समूहांचा आवाज .....**

आगामी काळात ओबीसी समाजातील साडेचारशेहून अधिक जात समूहांचा आवाज प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करणार असल्याचे हाके यांनी सांगितले. निवडणुका जवळ आल्या की ओबीसी समाजाची आठवण होते मात्र निवडणुका संपल्यानंतर त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते, अशी टीकाही त्यांनी राजकीय नेत्यांवर केली.

“गोपीनाथ मुंडे यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन ओबीसींच्या हक्कासाठी संघर्षाची धार आणखी तीव्र करणार. आगामी आंदोलनात ओबीसी समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,” असे आवाहन हाके यांनी केले.

गोपीनाथ गडावरून “थकणार नाही, रुकणार नाही आणि कुणासमोर झुकणार नाही” या निर्धाराने ओबीसी आरक्षणाच्या लढ्याला नवी ऊर्जा देण्याचा संदेश हाके यांनी दिला.

# गोपीनाथ गडावरील दर्शनानंतर लक्ष्मण हाके यांची नितीन मुंडे यांच्या घरी सदिच्छा भेट





**परळी वैजनाथ :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी गोपीनाथ गडावर जाऊन लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर तळेगाव येथील भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी नितीन मुंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

यावेळी मुंडे परिवाराच्या वतीने लक्ष्मण हाके यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. हाके यांनी नितीन मुंडे आणि त्यांच्या परिवाराशी अत्यंत आपुलकीने संवाद साधत विविध विषयांवर मनमोकळ्या गप्पा मारल्या. या भेटीत कौटुंबिक जिव्हाळा आणि सामाजिक विषयांवरील संवादाचे वातावरण पाहायला मिळाले. गोपीनाथ मुंडे यांच्या विचारांना अभिवादन करत ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हाके यांनी दिलेल्या भेटीमुळे नितीन मुंडे आणि परिवाराने अत्यंत समाधान व्यक्त केले. या प्रसंगी ओबीसी समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हाके यांच्या उपस्थितीमुळे परिसरातील मोठ्या प्रमाणामध्ये नागरिक यावेळी उपस्थित होते. “गोपीनाथ मुंडे यांच्या विचारांची प्रेरणा आणि कार्यकर्त्यांशी असलेला जिव्हाळा हीच सामाजिक चळवळीची खरी ताकद आहे,” अशी भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त करण्यात आली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)